# उपसंहार

# उ प सं हा र

एकोणिसावे शतक हे महाराष्ट्राच्या इतिहासात वैशिष्ट्यपूर्ण असे शतक होते. या शतकाच्या सुरवातीला महाराष्ट्रातील राजकीय परिस्थिती अतिशय गोंधळाची होती. येथे पेशव्याचे राज्य असले तरी राज्यात कायदा व सुव्यवस्था नव्हती. समाजजीवनावर वर्णव्यवस्थेचा फार मोठा प्रभाव होता. समाजाची विभागणी अनेक जातीमध्ये झाली होती. जाती-जातीमध्ये श्रेष्ठ-कनिष्ठ अशाप्रकारचा सामाजिक भेदभाव निर्माण झाला होता. समाजात ब्राम्हणांचे वर्चस्व प्रस्थापित झाले होते. समाजात नरबळी, बालहत्या, विधवा स्त्रियांचे केशवपन इत्यादि अनिष्ट प्रथा रूढ होत्या. या काळातील अर्थव्यवस्था प्रामुख्याने कृषिप्रधान अर्थव्यवस्था होती. समाजात शेती हाच सर्वात महत्त्वाचा व्यवसाय होता. शेतक-याची अवस्था मात्र हलाखीची होती.

इ.स. १८१८ मध्ये पेशवाईचा अंत झाला आणि महाराष्ट्रावर इंग्रजी अंमल सुरू झाला. इंग्रज राज्यकर्त्यांनी शिक्षणप्रसारावर भर देवून महाराष्ट्रात अनेक शिक्षणसंस्था सुरू केल्या. त्यामुळे येथील समाजात आधुनिक विचाराचे वारे वाहू लागले. साहजिकच महाराष्ट्राच्या सामाजिक, धार्मिक व सांस्कृतिक जीवनांत प्रचंड खळबळ माजून राहिली. पाश्चात्य विद्याविभूषित तरुणांनी आपल्या समाजव्यवस्थेकडे चिकित्सक दृष्टीने पाहण्यास सुरवात केली. समाजातील अनिष्ट चालीरीती, रूढी, परंपरा यामुळे समाजाचा घडून आलेला सांस्कृतिक व नैतिक अध:पात याची जाणीव त्यांना झाली. त्यामुळे आपल्या धर्मात व समाजात सुधारणा घडवून आणण्याची आवश्यकता त्यांना वाटू लागली. अशा-प्रकारे भारतीय समाजाच्या परिवर्तनाविषयी जाणीव निर्माण झालेली आणि समाजसुधारणेची तळमळ असलेली सुशिक्षित तरुणांची नवी पीढी या काळात उदयाला येवू लागली. या पिढीतून बाळशास्त्री जांभेकर, लोकहितवादी, दादोबा पांडूरंग, नाना शंकरशेट, विष्णुशास्त्री पंडित, गोपाळ कृष्ण गोखले यासारखे तरुण समाजसुधारक पुढे आले.

एकोणिसाव्या शतकांत महाराष्ट्राने अनेक अलौकिक व्यक्तींना जन्म दिला. त्यापैकी गोपाळ कृष्ण गोखले हे एक होत. एकोणिसाव्या शतकाचा अखेरचा कालखंड आणि विसाव्या शतकाचा प्रारंभीचा काळ या कालखंडातील राजकारणाचा अभ्यास करण्याच्या दृष्टीने गोखले यांचे जीवनचरित्र विशेष महत्त्वाचे आहे.

गोपाळ कृष्ण गोखले यांचा जन्म ९ मे, १८६६ रोजी एका गरीब कुटुंबात झाला आणि १९ फेब्रुवारी, १९१५ रोजी ते निवर्तले. म्हणजे मरणासमयी त्यांचे वय ४९ पेक्षा थोडे कमीच होते. पण या थोड्या आयुष्यात त्यांनी जे यश मिळविले तसे तत्कालीन पुढाऱ्यांपैकी विशेष कोणाच्या वाटयाला आले नाही.

गोखल्यांच्या चरित्राचा अभ्यास करीत असताना राष्ट्रसभेच्या स्थापनेनंतरच्या तीस वर्षांच्या कालखंडाचा विचार करावा लागतो. राष्ट्रसभेच्या आद्य संस्थापकांपेक्षा गोखले पुष्कळच तरुण होते. वयाची ४० वर्षे पूर्ण होण्यापूर्वीच हिंदुस्थान आणि इंग्लंड या दोन्ही देशात भारताच्या आशा-आकांक्षेचे प्रवक्ते म्हणून त्यांनी मान्यता मिळविली होती. भारतीयांच्या आशा-आकांक्षा व्यक्त करण्यास त्यांच्याहून अधिक लायक व्यक्ति सापडली नसती. मित्र व शत्रू दोघांनाही त्यांच्याबद्दल सारखाच आदर वाटत असे. स्वराज्यासाठी हिंदी लोक अपात्र आहेत, असा युक्तीवाद साम्राज्यवादी ब्रिटिश राज्यकर्ते करीत असत. त्यांचा युक्तीवाद किती मतलबी व खोटा आहे याचा जिवंत व चालताबोलता पुरावा गोखल्यांच्या रूपाने अस्तित्वात आला होता.

भारतीय राष्ट्रसभेचे पुढारी, इंपिरियल लेजिस्लेटिव्ह कौन्सिलचे सभासद, लंडन येथील राष्ट्रसभेच्या ब्रिटिश कमिटीचे विश्वासू सहकारी आणि इंग्लंडमधील भारताचे अनधिकृत राजदूत या सर्व भूमिका एकाच वेळी गोखल्यांच्या वाटयाला आलेल्या होत्या. भारतीय राजकारणांत त्यांचे स्थान अत्यंत महत्त्वाचे होते.

दुस-या कोणत्याही पुढा-याशी गोखल्यांची तुलना होवू शकत नव्हती. गोखले जसे राजकारणी होते तसे विचारवंतही होते. भारतात घडत असलेल्या राजकीय नाटकांत गोखले एक प्रमुख भूमिका वटवित होते. इतकेच नव्हे तर राजकीय घडामोडींचे ते मोठे मार्मिक समीक्षक होते. हिंदी राष्ट्रवाद तसेच हिंदुस्थान व ब्रिटन यातील संबंध समजून घेण्याच्या दृष्टीने गोखल्यांच्या चरित्राचा अभ्यास अतिशय फलदायी ठरणारा आहे.

ना. गोखले यांची भारताला सर्वात वैशिष्टयपूर्ण देणगी म्हणजे भारत सेवक समाज होय. देशाला सर्वात मोठी गरज नि:स्वार्थी, बुध्दिमान व देशा-साठी सर्वस्व अर्पण करणा-या कार्यकर्त्यांची आहे असे त्यांचे ठाम मत होते या जाणीवेतूनच त्यांनी या संस्थेची स्थापना केली.

ब्रिटिश राजवटीपूर्वी ख-या अर्थाने सार्वजनिक कार्याची कल्पना देशातील लोकांना नव्हती. ख्रिस्ती मिशन-यांनी शैक्षणिक संस्था, रूग्णालये स्थापन करून समाजसेवेचा मार्ग दाखविला होता. पण त्यांनी जे शैक्षणिक व वैद्यकीय मदतीचे कार्य केले, त्यामागे त्यांचा धर्मप्रसार करण्याचा हेतू होता असे लोकांना वाटे. असे असूनही सेवावृत्तीची जाणीव आपल्या लोकांत निर्माण झाली नव्हती. राजकारणात तर या वृत्तीचा अभाव विशेष जाणवत असे.

राजकीय प्रश्नांचे आवश्यक ज्ञान मिळवून दलित वर्गाच्या उध्दारासाठी तळमळीने कार्य करायला हवे असे कार्यकर्त्यांना वाटू लागले होते. याच तळमळीतून "डेक्कन एज्युकेशन सोसायटी" व पुण्यातील इतर कांही संस्था स्थापन झाल्या होत्या. समाजकल्याण कार्याची अशी सुरवात जरी झाली तरी राजकीय क्षेत्रात समर्पित भावनेने कार्य करणा-या कार्यकर्त्यांची गरज अद्यापही भासत होती. ती गरज पूर्ण करण्यासाठी ना. गोखले यांनी भारतसेवक समाजाची स्थापना केली.

या संस्थेची मध्यवर्ती कचेरी पुण्यास आहे. याशिवाय मुंबई, नागपूर, मद्रास व अलाहाबाद येथे उपशाखा आहेत. संस्थेच्या मध्यवर्ती केंद्रातच गोखले स्कूल ऑफ पॉलिटिक्स अँण्ड इकॉनॉमिक्स ही संस्था कार्य करीत असून देशाच्या बौध्दिक जीवनात तिचे स्थान महत्त्वाचे आहे.

वादाचे आणि आक्षेपाचे मुद्दे सोडून दिले तर या संस्थेची स्थापना ही तत्कालीन भारतीय इतिहासातील मोठीच घटना होती. त्यांची भाषणे, लिखाण व राजनैतिक कार्य याचा अभ्यास केल्यास गोखले हे रचनात्मक विचारवंत होते हे यावरुन सिध्द होते. त्यांनी लोकसेवेसाठी केलेली या संस्थेची स्थापना ही एक उल्लेखनीय कामगिरी म्हणून इतिहासात नमूद केली जाईल.

ना. गोखले यांचे राजकीय कार्य विधायक मुत्सद्याचे होते. त्यांनी आपले राजकीय कार्य श्रध्दापूर्वक केले. कारण पाश्चात्य उदारमतवादातील आदर्श तत्त्वे गोखले यांनी स्विकारली होती. ब्रिटिशांच्या न्यायबुध्दिवर त्यांचा विश्वास होता म्हणूनच त्यांनी सतत सनदशीर राजकारणाचा पुरस्कार केला. तथापि राजकीय क्षेत्रात त्यांनी मांडलेला सर्वात महत्त्वाचा विचार राजकारणाच्या अध्यात्मीकरणाबाबतचा आहे. सार्वजनिक जीवनाचे उदात्तीकरण घडवून आणावे व राजकारणात नैतिक मूल्यांना प्राधान्य द्यावे असा त्यांचा आग्रह होता.

जोपर्यंत आपण स्वत:चे कार्यक्षम प्रशासन निर्माण करु शकत नाही, तोपर्यंत ब्रिटिशांच्या प्रशासनाची आपणास आवश्यकता आहे असे त्यांना वाटत होते. ब्रिटिश राजवटीपासून कायमची फारकत त्यांना मान्य नव्हती. साम्राज्यांतर्गत स्वयंशासन आणि आपल्या देशबांधवासाठी अधिक उच्च दर्जाचे जीवन त्याना अभिप्रेत होते.

हिंदी जनता सुशिक्षित व जागृत होत असल्यामुळे हिंदी जनतेला सनदी सेवा व राज्यकारभार यंत्रणेमध्ये कांही जागा देणे ब्रिटिश सत्तेच्या हिताचे

आहे. कारण त्यामुळे ब्रिटिश सत्तेविरुद्ध वाटत असलेला असंतोष कमी होवू शकेल. लष्कर व सनदी नोकरावर जो अनाठायी खर्च केला जातो तो खर्च कमी केला पाहिजे. तरच देशाची आर्थिक व्यवस्था सुधारु शकेल. ब्रिटिश व हिंदी लोक असा भेदभाव न करता न्याय, कायदा व राज्यशासन यामध्ये समानतेचे तत्व स्विकारणे आवश्यक आहे. मंदगतीने कां होईना हिंदुस्थानात स्वराज्य निर्माण करणे ही गोष्ट ब्रिटिश व हिंदी जनता यादोघांच्याही फायद्याची आहे. असे त्यानी प्रतिपादन केले.

राष्ट्रसभेतील नेमस्त पुढारी सुरेंद्रनाथ बॅनर्जी, फिरोजशहा मेहता व गोपाळ कृष्ण गोखले यांना पाश्चात्य समाजसंस्था आणि विचारप्रवाह यांच्या अध्ययनाने आधुनिक जीवनमूल्याचे महत्व कळून आले होते. त्यामुळे व्यक्तिस्वातंत्र्य लोकशाही, सनदशीरपणा, इत्यादि ब्रिटिश राज्यपध्दतीमधील मूलतत्वावर त्यांची दृढ श्रध्दा होती. या तत्वांच्या अनुरोधाने प्राप्त होणारे नागरी हक्क ज्यांमध्ये हिंदी लोकांना निर्वेधपणे उपभोगता येतील असे वसाहतीचे स्वराज्य मिळविणे हे त्यानी आपल्या राजकीय चळवळीचे ध्येय ठरविले. कॅनडा, ऑस्ट्रेलिया वगैरे वसाहतींच्या उदाहरणावरुन हिंदुस्थानलाही ब्रिटिश साम्राज्यात राहून हे ध्येय साध्य करता येईल अशी त्यांना आशा वाटू लागली.

इंग्राजी राजवटीखाली हिंदुस्थानची झालेली प्रगती त्याना दिसत होती. धर्म, भाषा, जाती, वर्ण आणि प्रांत यांचे भेद नाहीसे होवून या ठिकाणी ख-या राष्ट्रीयत्वाची वाढ होण्यास इंग्राजांची सत्ता काही काळ तरी आवश्यक आहे असे त्यांचे मत होते. शिवाय इंग्राजांची न्यायबुध्दी व स्वातंत्र्यप्रियता यांवर त्यांचा विश्वास होता. वर्ण, जाती किंवा धर्म याबद्दलचा भेदभाव न मानता सर्व प्रजाजनांना समानतेने वागविण्याची अभिवचने इंग्लंडच्या राज्यकर्त्यांनी १८३३ आणि १८५८ च्या कायद्याने हिंदी प्रजाजनांना आपण होवून दिली होती. त्या आश्वासनांच्या आधारावर आपणास इंग्राजाकडून घटनात्मक राजकीय हक्क मिळविता येतील अशी त्यांना आशा होती.

SHIVAJI UNIVERSITY LIBRARY

राज्यकर्ते आणि प्रजा यांचा परस्पराबद्दलचा अविश्वास आणि दोन्ही देशातील वास्तविक परिस्थितीचे अज्ञान हीच त्यांच्या मते हिंदुस्थानच्या प्रगती-पथातील एकमेव समस्या होती. म्हणून राज्यकर्त्यांचे हेतू प्रजेला समजावून सांगणा-या आणि जनतेची गा-हाणी सरकारपुढे मांडणा-या दुभाष्याची भूमिका त्यांनी स्विकारली. गोखले हे या नेमस्त संप्रदायाचे महाराष्ट्रातील अध्वर्यू होते. त्यांची दृष्टी रानड्यांप्रमाणे अंतर्मुख आणि विधायक होती. म्हणून इंग्रजांना येथील परिस्थितीचे ज्ञान करुन दिले की संपले असे त्यांना कधीच वाटले नाही. तर लोकसत्ताक राज्यपध्दतीमधील व्यक्तिगत जबाबदारी सांभाळण्याची पात्रता आपल्या लोकांत आली पाहिजे. अशी तळमळ त्यांना लागून राहिली होती. मात्र पात्रतेची सबब पुढे करुन ब्रिटिशांनी हक्क देण्याच्या बाबतीत चालढकल करु नये. "स्वातंत्र्याचे हक्क दिल्यानेच लोक स्वातंत्र्याला लायक होतात." या ग्लॅडस्टनच्या विचाराची त्यांनी सरकारला आठवण करुन दिली.

लोकांची पात्रता वाढविण्यासाठी व त्यांना त्या प्रमाणात अधिकार मिळवून देण्यासाठी प्रचलीत राज्य पध्दतीत शांततेने आणि क्रमाक्रमाने बदल घडवून आणणारा सनदशीर मार्गच त्यांना सर्वात श्रेयस्कर वाटला. न्याय आणि कायदेशीर मार्गांनी राज्यकर्त्यांवर लोकमताचे दडपण आणून सुधारणा घडवून आणणे अशी गोखल्यांनी सनदशीरपणाची व्याख्या केली होती. सशस्त्र बंड, परकीय आक्रमणाला मदत व गुन्हेगारी हे तीन प्रकार सोडून अर्ज विनंत्यापासून करबंदीपर्यंत प्रत्येक चळवळीचा या सनदशीरपणात समावेश करण्यास त्यांची तत्वत: मान्यता होती.

गोखल्यांचा उदय झाला तेव्हाच महाराष्ट्रात टिळकांचा उदय झाला. वस्तुत: गोखले आणि टिळक यांचे तसे व्यक्तिगत वैर नव्हते. टिळकांच्या उदाहरणाने प्रेरीत होवूनच गोखल्यांनी सार्वजनिक कार्यात प्रवेश केला होता. कांही काळ तरी परस्परांचे सहकारी म्हणून ते एकाच शिक्षणसंस्थेत वावरले

होते. पण नंतरच्या काळात त्यांच्यात तीव्र मतभेद निर्माण झाले. कारण दोघांच्या दृष्टीकोनात व कार्यपध्दतीत फरक होता. गोखले नेमस्त वृत्तीचे उपासक होते तर टिळक जहाल बाण्याचे होते. एक सनदी राजकारणावर सातत्याने भर देणारा, तर दुसरा इंग्रजविषयक असंतोषाचा वन्ही जनमानसात चेतवता येईल तेवढा चेतवित राहणारा. वस्तुत: तत्कालीन एकाच राजकीय नाण्याच्या या दोन बाजू होत्या. देशसेवा हेच या दोघांचे जीवनवृत्त होते. पण स्वभाव भेदामुळे आणि तत्कालीन परिस्थितीमुळे ते एकमेकांचे विरोधक बनले.

अनेक विचारवंतांनी जहाल आणि मवाळ गटांच्या कार्याचे मूल्यमापन केले आहे. काहींनी मवाळांना दोष देवून जहाल मार्गाचे समर्थन केले आहे. तर काहींनी जहालांना दोष देवून तत्कालीन परिस्थितीत मवाळांचा मार्ग योग्य होता असे म्हंटले आहे. काळाचा प्रवाह पुढे सरकत असता पहिल्या पिढीतील सुधारक दुसऱ्या पिढीला परंपरावादी व स्थितीप्रिय वाटावे व त्यामुळे दुसऱ्या पिढीने पहिल्या पिढीच्या पुढे पाऊल टाकावे हा सर्वसामान्य नैसर्गिक नियमच आहे. हाच नियम मवाळ जहालांनाही लागू आहे. मात्र एक लक्षणीय बाब अशी की, १८८०-८५ मध्ये जहालमतवादी असणारे सुरेंद्रनाथ १९०७ नंतर स्थितीप्रिय व मवाळ बनले व १९०५-०६ मध्ये जहालमतवादी असलेले बिपिनचंद्रही १९१८ पर्यंत मवाळ बनले. टिळक आणि लाला लजपतराय मात्र याला अपवाद ठरले. १९२० साली गांधींनी असहकाराची चळवळ सुरु करण्यापूर्वी टिळकांचा सल्ला विचारला असता, देश तुमच्या मागे आला तर मीही तुमच्याबरोबर आहे असे टिळकांनी त्यांना सांगितले. या विधानातील मर्म लक्षात घेण्याजोगे आहे.

१९०२ ते १९११ या काळांत गोखल्यांनी अर्थसंकल्पावर अकरा भाषणे दिली. ते आपली भाषणे पध्दतशीर माहिती गोळा करुन तयार करीत असत. त्यामुळे देशाच्या अर्थविषयक प्रश्नावर प्रकाश पडत असे. व्यापक दृष्टी आणि अचूक आकडेवारी यामुळे त्यांचे अर्थसंकल्पावरील पहिलेच भाषण अपूर्व ठरले.

प्रतिवर्षी वाढत जाणाऱ्या करवाढीमागील अन्याय त्यांनी स्पष्टपणे मांडला. भारतीय जनतेच्या दारिद्र्याबद्दल त्याना किती चिंता लागली होती हे त्यावरुन स्पष्ट झाले. अर्थसंकल्प शिलकी असल्यामुळे लॉर्ड कर्झन व सरकार आत्मसंतुष्ट होते. परंतु ही शिल्लक कशी फसवी आहे हे गोखल्यांनी दाखवून दिले.

करांचा डोईजड बोजा कमी करण्याची मागणी करुन राष्ट्र समृध्द करण्यासाठी जास्त खर्च करण्याची आवश्यकता त्यांनी प्रतिपादन केली. लष्करावरील खर्च कमी केल्यास या दोन्ही गोष्टी (करांचा बोजा कमी करणे व राष्ट्रविकासावर जास्त खर्च) शक्य आहेत असे त्यांनी सांगितले.

मुलकी आणि लष्करी खर्च सतत वाढत राहिल्याने या प्रश्नाची चौकशी करण्यासाठी कमिशन नेमण्यात यावे अशी मागणी गोखल्यांनी अनेकदा केली. तसेच १९०८ पासून सुरु झालेल्या भाववाढीची चौकशी करावी असेही त्यांनी सुचविले. सरकारने या सूचनाकडे कांहीच लक्ष दिले नाही. त्यामुळे जानेवारी, १९११ मध्ये त्यानी एक ठराव सादर केला या ठरावावरील भाषणात त्यानी १८७५ पासून १९०८ पर्यंत खर्चाची वाढ कशी होत आली याचे तुलनात्मक परीक्षण केले आहे. त्यावरुन या विषयाचे त्यांचे सखोल ज्ञान आणि दीर्घ परिशीलन दिसून येते.

देशसेवेसाठी स्वार्थत्यागाने आयुष्यभर झिजणारा आदर्श नेता म्हणून ना. गोखले प्रसिध्द आहेत. ब्रिटिश सत्तेची कांही काळ हिंदुस्थानात आवश्यकता असून या काळात हिंदी जनतेची राजकीय, सामाजिक व आर्थिक प्रगती झाली पाहिजे अशी त्यांची विचारसरणी होती.

गोखले यांचा विविध सामाजिक व शैक्षणिक संस्थाशी निकटचा संबंध होता. पुण्याच्या सार्वजनिक सभेचे सेक्रेटरी म्हणूनही त्यांनी कांही काळ काम केले. सार्वजनिक कार्यात भाग घेवून राजकारण, अर्थकारण व समाजकारण इ.

क्षेत्रात आपल्या विचाराने जनतेत जागृती घडवून आणली. राष्ट्रासाठी त्यागी व नि:स्वार्थी भावनेने कार्य करणाऱ्या तरुणांची आवश्यकता होती. त्या गरजेतूनच त्यानी १९०५ मध्ये भारत सेवक समाजाची स्थापना केली.

गोखले अभ्यासू वृत्तीचे होते, कायदेमंडळात गोखले यांनी केलेली भाषणे तत्कालीन आर्थिक व सामाजिक परिस्थितीवर प्रकाश टाकणारी होती. शेतकऱ्यांच्या दारिद्र्याकडे सरकारचे लक्ष वेधण्याचा त्यानी प्रयत्न केला. देशातील कोट्यावधी गोरगरीब व पददलीत जनतेविषयी त्यांना नेहमीच आत्मीयता वाटत असे.

काँग्रेस ही बुध्दिजीवी वर्गाची संघटना न बनविता काँग्रेसच्या व्यासपीठावरुन त्यांनी राष्ट्रीय प्रश्नांना हात घातला. पुढे काँग्रेसमध्ये नेमस्त व जहाल असे दोन गट पडले. गोखले नेमस्त युगाचे नेते होते. नेमस्तांनी भारतीय राजकारणाला एक वेगळे वळण लावले. जात, धर्म, वंश या भेदाच्या पलीकडे जावून राष्ट्रीय ऐक्याच्या निर्मितीला हातभार लावला. थंड गोळा होवून पडलेल्या भारतीय सुशिक्षितात पहिली जागृती त्यांनीच केली. त्यांनी राष्ट्रकार्याची सुरवात केली. त्यानी तयार केलेल्या पायावरच राष्ट्रीय कार्याची इमारत उभारणे पुढील पिढीला शक्य झाले.

.......

# संदर्भ ग्रंथ सूची

**ENGLISH BOOKS :**

1. Banerji Surendranath, A Nation in the making, Calcutta, 1863.

2. Bakshi S.R., Gopal Krishna Gokhale, The Moderate Leader, Anmol Publications, 1991.

3. Bhagat Achyut Keshav. (E.D.), Maharashtra - A Profile, Feliciation Volume - Published by A.K. Bhagwat, for V.S. Khandekar, Amrit Mohotsava Satkar Samiti Kolhapur, 1977.

4. Speeches of Gopal Krishna Gokhale, Vol. 3, Madras, 1920.

5. Jaykar M.R., The story of my life, Bombay, Vol. 1. Asia Publishing house London, 1958.

6. Karve & Ambekar (ED), Speeches & Writting of Gopal Krishna Gokhale., Vol. 3.

7. Mathur D.B., Gokhale, A Political Biography, Manaktalas Bombay, First Published 1966.

8. Mahajan Vidya Dhar, Leaders of the Nationalist Movement.

9. Paranjape R.P., Gopal Krishna Gokhale, 1915.

10. Parvate T.V., Gopal Krishna Gokhale, Ahamadabad, 1959.

11. Patwardhan R.P., Ambekar P.V. (ED), The Speeches & Writting of Gopal Krishna Gokhale, Vol.1, Economic, Decan-Sabha, Poona-2, 1962.

12. Miscellaneous Writtings of M.G. Ranade.

13. Ranade Ramabai, Ranade his wife's reminiscence, Delhi,1963.

14. Setu Mahav Rao, Executive Editor & Secretary Maharashtra State Gazetteers.
Government of Maharashtra, History Part-III Directorate of Government Printing Stationary and Publications, Maharashtra State, 1967.

15. Shastri V.S.S., Life of Gopal Krishna Gokhale, Bangalore, 1937.

16. Shah A.B. & Aiyar S.P., Gokhale & Modern India, Manaktalas Bombay, First Published, 1966.

मराठी ग्रंथ :

१. चोसाळकर अशोक, म. फुले आणि शेतकरी चळवळ, लोकवाङ्मय गृह भूपेश गुप्ताभवन, प्रभादेवी, मुंबई, १९९०.

२. देशपांडे गोपाळ आबाजी, काँग्रेस कथा, सुलभ राष्ट्रीय ग्रंथमाला, पुष्प ३८वे, काँग्रेस हिरक महोत्सव, डिसेंबर, १९८६.

३. लेखक - देवगिरीकर, अनुवादक - कानिटकर, रा.प्र. गोपाळ कृष्ण गोखले, प्रकाशन विभाग माहिती आणि नभोवाणी मंत्रालय, भारत सरकार मार्च,७१.

४. दामले प्र.रा., पाच थोर नेते (रानडे, टिळक, आगरकर, गोखले, गांधीजी) आयडिएल प्रकाशन, १९६२.

५. फडके य.दि., शोध बाळ गोपाळांचा, श्रीविद्या प्रकाशन, २५०, शनिवार पेठ,पुणे-३०,जून, १९७७.

६. फाटक नरहर रघुनाथ, आदर्श भारत सेवक, गोपाळ कृष्ण गोखले, गोखले चरित्र, मौज प्रकाशन, मुंबई, १९६७.

७. फाटक नरहर रघुनाथ, अर्वाचीन महाराष्ट्रातील सहा थोर पुरुष, मुंबई मराठी ग्रंथसंग्रहालय प्रकाशन, १९५१.

८. फाटक नरहर रघुनाथ, लोकमान्य, मौज प्रकाशन, मुंबई, १९७२.

९. फडके य.दि., विसाव्या शतकांतील महाराष्ट्र, खंड-१, श्रीविद्या प्रकाशन, २५०, शनिवार पेठ, पुणे-३०, १९८९.

१०. गोपाळ कृष्ण गोखले, जन्म-शताब्दी-अभिवादन, महाराष्ट्र परिचय केंद्र, महाराष्ट्र शासन, नवी दिल्ली, १९६६.

११. गोखले पुरुषोत्तम पांडूरंग, नामदार गोपाळ कृष्ण गोखले, चरित्र, नीलकंठ प्रकाशन, पुणे-९, प्रथमावृत्ती, १९६६.

१२. म. गांधी, माझे राजकीय गुरु, चेतक पुस्तके गिराबाजार मुंबई-२, प्रथमावृत्ती, १९६९.

१३. म. गांधी, संकलित वाङ्मय खंड-३, प्रसिध्दी विभाग, मुंबई राज्य, १९६२.

१४. जांभेकर ग.ग. (संपादक), आचार्य बाळशास्त्री जांभेकर यांचे जीवनवृत, खंड-३, १९५०.

१५. जावडेकर श.द., आधुनिक भारत, सुलभ राष्ट्रीय ग्रंथमाला,
शनिवार पेठ, पुणे-२०, सन १९९०.

१६. कर्वे द.गो., स्वतंत्र भारताचे दृष्टे, न्यायमूर्ती रानडे,
अनुवाद - कुलकर्णी गो.म., आर्यभूषण मुद्रणालय, पुणे, १९४२.

१७. कुलकर्णी अ.रा., खरे ग.ह. (संपादक) मराठयांचा इतिहास, खंड ३,
कॉन्टिनेन्टल प्रकाशन, विजयानगर, पुणे-३०, सन १९८६.

१८. कुंझरु पंडित -हृदयनाथ, गोपाळ कृष्ण गोखले, व्यक्ति आणि कार्य,
महाराष्ट्र परिचय केंद्र, नवी दिल्ली, ९ मे, १९६६.

१९. कीर धनंजय, मालशे स.ग. (संपादक), म. फुले समग्र वाङ्मय,
दुसरी आवृत्ती, १९८०.

२०. खेर भा.द., लोकमान्य टिळक दर्शन, केशरी प्रकाशन, पुणे, १९७२.

२१. समग्र लोकमान्य टिळक, खंड ४, केसरी प्रकाशन, पुणे, १९७६.

२२. माळी मा.गो., हा धन्य जोतिबा झाला, आशा प्रकाशन, गारेगोटी,
जि. कोल्हापूर, १९५५.

२३. मालसे स.ग., आपटे नंदा, विधवा विवाह चळवळ (१८००-१९००)
सन, १९७८.

२४. नगरकर वसंत, भारतीय स्वातंत्र्य संग्राम, प्रेस्टीज प्रकाशन,
४६१/१, सदाशिव पेठ, पुणे, जानेवारी, १९८१.

२५. नंदा बलराम, गोपाळ कृष्ण गोखले, ब्रिटिश राजवट आणि भारतीय
नेमस्त युग, विश्वकर्मा साहित्यालय, सदाशिव पेठ, टिळकपथ पुणे-२,
आक्टोबर, १९८६.

२६. पोतदार द.वा., लोकमान्य टिळकांचे सांगाती, केसरी प्रकाशन, पुणे १४ ऑक्टोबर, १९७५.

२७) पंडित नलिनी, महाराष्ट्रातील राष्ट्रवादाचा विकास, मॉडर्न बुक डेपो, प्रकाशन, १९५५.

२८. प्रियोळकर अ.का.रा.ब. रायोबा पांडूरंग आत्मचरित्र व चरित्र, पॉप्युलर प्रकाशन, मुंबई, १९४७.

२९. साळुंखे पी.बी., म. फुले ग्रंथ संपादक मंडळ, अध्यक्ष, प्रकाशक, महाराष्ट्र राज्य शिक्षण विभाग, मंत्रालय मुंबई, १९८२.

३०. साने गुरुजी, नामदार गोखले चरित्र, व्हीनस प्रकाशन, पुणे-२, प्रथमावृत्ती, १९२५.

३१. शिरोडकर पा.पु., भारतीय समाजविघटक, जाती-धर्म-वर्ण व्यवस्था, कालिका प्रकाशन विश्वस्त मंडळ, वास्को-द-गामा, गोवा, १९८६.

३२. शालीग्राम शं. तु., थोर पुरुषांचे व स्त्रियांचे पोवाडे, १८७९.

३३. टोके मो.नी., आधुनिक महाराष्ट्राचे उद्गाते, पारस प्रकाशन, बेळगाव, प्रथमावृत्ती, १९८९.

३४. तळवलकर गोविंद, नौरोजी ते नेहरु, केशव विष्णू केठावळे मॅजेस्टिक बुक स्टॉल, गिरगाव नाका, मुंबई-४, सन १९६९.

३५. वाळिंबे रा.शं., १९व्या शतकांतील महाराष्ट्राची सामाजिक पुनर्घटना, भाग १ (१८०० ते १८४५) प्रकाशक, वाळिंबे रा.श., पुणे, १९६२.

३६. व्हटकर नामदेव, भारतातील जातीवाद व त्यावर उपाय, अजब पुस्तकालय, कोल्हापूर, प्रथमावृत्ती, १९६२.

३७. वैद्य सुमन, कोठेकर शांता, आधुनिक भारताचा इतिहास, महाराष्ट्र विद्यापीठ ग्रंथनिर्मिती मंडळाकरीता, विद्या बुक्स औरंगपूरा, प्रथमावृत्ती, १९८५.

३८. वाळींबे मो.मा., महामानव नामदार गोखले यांचे चरित्र, नीलकंठ प्रकाशन, पुणे-३०, प्रथमावृत्ती, १९६९.

हिंदी ग्रंथ :

१. मिश्र नारायण बी.ए., इंडियन प्रेस लिमिटेड, प्रयाग, १९३४.
२. गुप्त केदारनाथ गणेश पांण्डेय, भारत के कर्मयोगी महापुरुष, छात्रहितकारी पुस्तकमाला दारागंज प्रयाग, १९६६.

नियतकालिकातील लेख :

१. समाज प्रबोधन पत्रिका, २५ जानेवारी-फेब्रुवारी, १९६९. लेखक - प्रभाकर पाध्ये, लेख - महाराष्ट्रीय विचारवंतांची परंपरा.
२. लोकराज्य, १ आक्टोबर, १९९३.
३. नवभारत, नोव्हेंबर, १९६६.
४. नवभारत, डिसेंबर, १९८५.
५. फडके य.दि., शोध सत्य शोधकांचा, तरुण भारत (नागपूर), दीपावली विशेषांक, १९८३.
६. साप्ताहिक दीनबन्धू, मुंबई, १६ डिसेंबर, १९०५.
७. त्रैमासिक भारतीय इतिहास आणि संस्कृती, जानेवारी-मार्च, १९८६. लेखक - खोबरेकर वि.गो., लेख - मुंबईतील स्वातंत्र्य चळवळ.
८. लोकशिक्षण, डिसेंबर, १९३५.
९. क्वाटर्ली जर्नल ऑफ द पूना सार्वजनिक सभा, १८९८.

......